## ANNEXURE- IX

### Participation of Volunteers in various Camps / Lead In Last 3 Years ? (International Delegation, Mega NIC, Adventure Camps, RD and State Level Activity)

**To increase awareness about health consciousness in society during Covid 19 Pandemic the International Yoga were organized with International Yoga Guru Nihel Bichane from Tunetia .**

**. Celebration of International Yoga Day (21 June)**





पुण्य नगरी

# ट्यूनेशियाच्या निहेल बिचिनीने दिले अंबाजोगाईत योगाचे धडे

## कृषी महाविद्यालयात 'योगदिन' साजरा

**अंबाजोगाई/प्रतिनिधी:** कृषि महाविद्यालय अंबाजोगाई येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सोमवार, दि.२१ जून रोजी 'जागतिक योग दिनाचे' औचित्य साधून योगदिन साजरा करण्यात आला. ट्युनेशियाच्या निहेल बिचिनी यांनी विविध योगाद्वारे उपस्थितांना प्रशिक्षण दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व मुख्य मार्गदर्शक म्हणून वनामकृविचे संचालक शिक्षण डॉ.धर्मराज गोखले, समन्वयक म्हणून कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पखवाज वादक पं.उद्धवबापू आपेगावकर व सामाजिक कार्यकर्ते वसंतराव मोरे हे उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगतात डॉ.धर्मराज गोखले यांनी योगामुळे माणसाचे जीवन शारीरिकदृष्ट्या आरोग्यसंपन्न व मानसिकदृष्ट्या निरामय बनत असते. शारीरिक व मानसिक विकासाच्या आणि आरोग्याच्या दृष्टीने योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे असे सांगून त्यांनी उपस्थितांना योगदिनाच्या शुभेच्छा दिल्या. समन्वयक डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांनी मानसिक, शारीरिक व बौद्धिक क्षमता विकसित करण्यासाठी नियमित योगाभ्यास आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. ऑनलाईन पध्दतीने योगाचे प्रशिक्षण ट्युनेशियाच्या निहेल बिचिनी यांनी विविध योगाद्वारे उपस्थितांना प्रशिक्षण दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.नरेंद्र कांबळे केले तर आभार रासयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ.बसलिंगाप्पा कलालबंडी यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.सुहास जाधव, प्रा.सुनिल गलांडे, डॉ.नरेंद्र कांबळे, डॉ.नरेशकुमार जायेवार, प्रा.रणधीर कदम, प्रा.मन्मथ बेरकिले, यादव पाटील, स्वप्नील शिल्लार, भास्कर देशपांडे, राजेश रेवले, प्रल्हाद थोरात, हनुमंत सुर्वे, नंदकिशोर मोरे आदींची परिश्रम घेतले.



=